# पृथ्वीराज चव्हाण

लोकहितवादी

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**पृथ्वीराज चव्हाण : लोकहितवादी**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, उद्यमनगर, कोल्हापूर.

**आवृत्ती**
जानेवारी, २०१३

**किंमत**
रुपये ११०/-

# तसबिरीचा खुलासा

मध्यभागी, हातात कमान व पायात आणि गळ्यात साखळदंड असणारा तो पृथ्वीराज चव्हाण होय. त्याला शहाबुद्दीन गोरीने आंधळे केले होते.

पृथ्वीराजाचे समोर जवळच हातात भाला वगैरे घेऊन उभा आहे तो चंद भाट होय.

पृथ्वीराजाचे मागे डोक्याचे बाजूला उंचावर सात लोखंडी तवे लटकविलेले असून त्यावर शब्दवेधशरसंधान करून आरपार बाण काढण्याची अट होती.

पृथ्वीराजाचे समोरच उंच सज्जासारखी जागा आहे, तीत शहाबुद्दीन गोरी वगैरे दरबारी मंडळी बसली असून गोरीच्या मस्तकास पृथ्वीराजाचा बाण भेदून गेल्यामुळे तो तख्तावरून खाली पडत आहे.

शेवटी, खालच्या बाजूला दोघेजण एकमेकांच्या गळ्यांवर तलवारी मारीत आहेत. ते पृथ्वीराज चव्हाण आणि चंद भाट हे होत.

# अनुक्रमणिका

❍ **उपक्रम –** १. उपोद्धात. २. पृथ्वीराजरासा. ३. भाटांविषयी माहिती. ४. राजस्थान व गुजराथ या प्रांतांचे इतिहास. ५. पृथ्वीराजरासा यांतील गुणदोष. ६. हा ग्रंथ व या इतिहासावरून पूर्वीची माहिती. ७. अजमीरचा पीर. ८. अजमीर. ९. हा ग्रंथ लिहिण्याचा हेतु.

पृष्ठ ११ ते १८

❍ **प्रकरण पहिले –** १. क्षत्रियवंशाचा प्राचीन इतिहास. २. हस्तिनापूरचा राजा अनंगपाळ. ३. पृथ्वीराजाची मातृपीठिका. ४. चव्हाणवंश. पृथ्वीराजाची पूर्वपीठिका. ५. पृथ्वीराजाचा जन्म. ६. चव्हाण व राठोड या उभय कुळांत कलह. ७. दिल्लीशहर ८. नागोरचा खजिना. ९. पृथ्वीराजाचा विजय.

पृष्ठ १९ ते २४

❍ **प्रकरण दुसरे –** १. चामुंडराय. २. रोशन अल्लीची अद्भुत कृत्ये. ३. मीरासाहेबाची तयारी. ४. मीरा व त्याचे लोक हिंदुस्थानात येतात. ५. खिंग नावाचा घोडा. ६. मुसलमानांची लढाईची उद्युक्तता. ७. चामुंडरायाचा प्रयत्न व सिद्धि. ८. चामुंडरायाची प्रतिज्ञा. ९. चामुंडरायाचा विजय. १०. ख्वाजा पीराचे हिंदुस्थानात आगमन. ११. ख्वाजा पीराशी संधि करण्यास चंद भाट जातो. १२. पृथ्वीराजाचे अजमीराहून प्रयाण व अजमीरावर मुसलमानांचा ताबा.

पृष्ठ २५ ते ३३

❍ **प्रकरण तिसरे –** १. पट्टणचा राजा भोळा भीमदेव. २. भीमदेवाशी प्रमारराजाची लढाईची तयारी. ३. प्रमारास पृथ्वीराजाचे साह्य. ४. पृथ्वीराजाचे सैन्याची व्यवस्था. ५. पृथ्वीराजाचा भीमदेवावर विजय. ६. प्रमारकन्या इच्छनीकुमारी इजसी पृथ्वीराजाचा विवाह.

पृष्ठ ३४ ते ३९

❍ **प्रकरण चौथे –** १. पृथ्वीराजाकडून पद्मावतीचे पाणिग्रहण. २. शहाबुद्दीनाशी युद्धप्रसंग व त्याचा पराजय. ३. महोबाचा राजा परमाल याजबरोबर कलह. ४. परमालाचे सरदार उदल व अल्ह यांस परमालाकडून हद्दपारीची शिक्षा. ५. पृथ्वीराजाची

चंदेला (बुंदेलखंडा) वर स्वारी. ६. लढाईविषयी परमाल राजाचा विचार. ७. त्याची तयारी व लढाईत पराजय. ८. अल्ह व उदल यांस परत बोलावण्याचा विचार. ९. त्यास आणण्याकरिता परमालाकडून जगनक भाटाची रवानगी. १०. त्यांचे महोबास पुनरागमन. ११. युद्धाची सज्जता व तिचे वर्णन. १२. अल्ह व उदल लढाईला निघतात. १३. परमाल राजा भिऊन पळून जातो. १४. याचा पुत्र ब्रह्मचित् याचे धैर्य. १५. महोबा येथील लढाईची सुरुवात. उदल याचे शौर्य आणि त्याचा मृत्यु. १६. उदल याचे वर्णन. १७. अल्ह याचा पराक्रम. १८. ब्रह्मजिताचा पृथ्वीराजाकडून अंत. १९. अल्ह शस्त्रत्याग करून वैराग्य धारण करितो व रणांतून चालता होतो. २०. महोबाचे लढाईचा शेवट व पुढील व्यवस्था. २१. पृथ्वीराज दिल्लीस परत जातो.

पृष्ठ ४० ते ५२

❍ **प्रकरण पाचवे –** १. कनौजचा राजा जयचंद. २. त्याचा राजसूययज्ञाचा बेत. ३. त्याला सुमतिप्रधानाची हरकत. ४. राजसूययज्ञाची तयारी. ५. पृथ्वीराजाची यज्ञास प्रतिकूलता. ६. पृथ्वीराजाचे पारिपत्यार्थ वालुकारायाची योजना. ७. पृथ्वीराजाचा जयचंदास विघ्न करण्याचा विचार. ८. वालुकारायावर कन्ह चव्हाणास पाठवितात. ९. कन्हाचे व वालुकारायाचे युद्ध व त्यात वालुकारायाचा मृत्यु. १०. राजसूययज्ञास विघ्न व त्याची असांगता. ११. राजकन्या संयोगता. १२. तिला सखीचा उपदेश. १३. वसंतवर्णन. १४. संयोगतेचे उत्तर. १५. जयचंदाचा कन्या संयोगेच्या हट्टासंबंधाने खेद. १६. संयोगतेला सखीचा पुनरुपदेश. १७. संयोगतेचा शेवटचा जबाब. १८. कन्येच्या सुधारण्याविषयी जयचंदाचा निरुत्साह आणि संयोगतेला बंदी

पृष्ठ ५३ ते ५९

❍ **प्रकरण सहावे –** १. प्रकरणप्रस्ताव. २. पृथ्वीराजाचे कंठमणि. ३. कयमाषाचे वर्णन. ४. चामुंडराय व त्याजवरील संकट. ५. चामुंडरायाकडून मत्त हत्तीचा वध. ६. चामुंडरायाला कैद व त्याचा शस्त्रत्याग. ७. पृथ्वीराज कयमाष प्रधानाकडे राज्य सोपवून मृगयेस जातो. ८. कयमाषाचा कारभार व त्याचे अविचारी कृत्य. ९. कयमाषाच्या अविचारी गुप्त कृत्याचा स्फोट. १०. त्याचा पृथ्वीराजाच्या हाताने वध. ११. कर्नाटकी वेश्या कनौजास जाते. १२. कयमाषाच्या मृत्यूचे देवीकडून चंदाला कथन. १३. कयमाषाच्या स्त्रीचे सहगमन. १४. पृथ्वीराजाचे शिकारीस जाणे व तेथे दुर्गा केदाराची भेट. १५. शहाबुद्दीन गोरीचा दुसऱ्याने पराभव. १६. त्याशी सल्ला.

पृष्ठ ६० ते ६६

❍ **प्रकरण सातवे –** १. कनौजावर जाण्याची तयारी. २. कनौजदरबारात चंद व पृथ्वीराज यांचे गमन. ३. चंदाकडून जयचंदाची स्तुति. ४. जयचंदाकडून चंद भाटाचा उपहास. ५. जयचंद व चंद यांची उत्तरे प्रत्युत्तरे. ६. जयचंद चंदाचा सत्कार करितो. ७. त्यांचे परस्पर संभाषण. ८. चंद भाट गोरीच्या पराभवाची हकीकत जयचंदास सांगतो व पृथ्वीराजाची तारीफ करितो. ९. पृथ्वीराजाला ओळखून काढण्याविषयी जयचंदाचा प्रयत्न. १०. कर्नाटकीच्या चातुर्याने संकटमुक्ति. ११. चंदाकडे नजरनजराणे आणि भेटी जातात. १२. पृथ्वीराजाचे गुप्तरूप कळते. १३. पृथ्वीराज व चंद यांची भाषणे. १४. लंगडीरायाची जयचंदावर योजना. १५. लंगडीरायाचा अंत. १६. पृथ्वीराज व राजकन्या संयोगता यांची नजरानजर. १७. दासीबरोबर पृथ्वीराज संयोगतेच्या महालांत जातो. १८. पृथ्वीराज व संयोगता यांचा संवाद. १९. त्या उभयतांचा गांधर्वविधीने विवाह. २०. पृथ्वीराज संयोगतेच्या महालातून निघतो. २१. त्याची व पठाणाच्या टोळीची चकमक. २२. कन्ह व पृथ्वीराज यांचा संवाद. २३. संयोगतेला कनौजाहून दिल्लीस घेऊन जाण्याचा बेत. २४. संयोगतेचीही दिल्लीस जाण्याविषयी संमति. २५. पृथ्वीराज व संयोगता यांचे दिल्लीस प्रयाण. २६. पृथ्वीराज जयचंदास निरोप पाठवितो. २७. जयचंदाचा रोष आणि पृथ्वीराजाचा पाठलाग. २८. आतताई व कहरकंठीर यांचा संग्रामात अंत: कहरकंठीर याची हकीकत. २९. आतताईचे पूर्ववृत्त. ३०. पृथ्वीराजाच्या व जयचंदाच्या लोकांचे तुमुल युद्ध. ३१. पृथ्वीराजाचा भाचा अल्हन व त्याचे चरित्र. ३२. पृथ्वीराज मोठ्या कष्टाने दिल्लीस येतो. ३३. जयचंद पृथ्वीराजाचें व संयोगतेचें लग्न लावितो.

पृष्ठ ६७ ते ८९

❍ **प्रकरण आठवे –** १. दिल्ली येथील लग्नोत्सव. २. लग्नोत्सवसंबंधी मेजवान्या व करमणुकी. ३. पृथ्वीराजास चक्षु:श्रवा ऋषीचा शाप. ४. पृथ्वीराजाचा मदांधपणा आणि असावधगिरी. ५. त्याला शुद्धीवर आणण्याचा उपाय. ६. त्याकरिता त्याला चिठ्ठी जाते. ७. संयोगतेच्या आज्ञेवरून तिच्या दासी चिठ्ठी नेणाऱ्या चंद भाट वगैरेस मारितात. ८. राजा व राणी हीही त्यांचा उपमर्द करितात. ९. चंदाचा व हाहुलीरायाचा संवाद. १०. हाहुलीराय दिल्लीतून निघून जातो व दिल्लीवर महत्संकट. ११. हाहुलीराय गिझनीस जातो व शहाबुद्दीनास घेऊन दिल्लीवर येतो. १२. चितोडचा राणा समरसिंह रावळ हा दिल्लीचे रक्षणार्थ येतो. १३. समरसिंहाचे वर्णन. १४. तो पृथ्वीराजाकडे

पोपटाबरोबर निरोप लिहून पाठवितो. १५. त्या संबंधाने पृथ्वीराज व संयोगता यांचे संभाषण. १६. राजाचे राजवाड्यात आगमन. १७. समरसिंहाचा सत्कार व प्रजाजनांचे आनंददर्शन. १८. वीरभद्राचा आविर्भाव. १९. त्याचे भविष्यकथन. २०. भविष्यकथनाने राजाचा हवालदीलपणा आणि वीरभद्राकडून समाधान. २१. पृथ्वीराजाचे दु:स्वप्न. २२. त्याबद्दल संयोगतेकडून समाधान. २३. दु:स्वप्न प्रशांत्यर्थ उपाय. २४. फौजेची तयारी आणि संयोगतेचा अभिप्राय. २५. पृथ्वीराज व संयोगता यांची शेवटची भेट. २६. पृथ्वीराजाकडील फौजेची व्यवस्था. २७. दोन्ही लष्करांचा सामना. २८. पृथ्वीराज पकडला जातो. २९. समरसिंहाचा मृत्यु. ३०. राजपुत्र रेणसी याचा मृत्यु. ३१. या लढाईचे ठिकाण. ३२. जयचंदाचा मृत्यु व कनौजाची उद्ध्वस्तता. ३३. मुसलमानांचे पुंडावे आणि हिंदुस्थानांतील अराजकता. ३४. पृथ्वीराजाचे अंताविषयी दोन मते. ३५. चंद भाटाचे गिझनीस गमन व पृथ्वीराजाची भेट. ३६. पृथ्वीराजाचा शब्दवेधचमत्कार पाहण्याची मसलत. ३७. शब्दवेधचमत्कार पाहण्याची तयारी. ३८. पृथ्वीराजास चंदाचा इशारा. ३९. पृथ्वीराजाचे शरसंधान व शाहाबुद्दीनाचा शेवट. ४०. पृथ्वीराज व चंद यांचा अंत. ४१. उपसंहार.

पृष्ठ ९० ते ११२

# उपक्रम

१. उपोद्घात. - २. पृथ्वीराजरासा. - ३. भाटांविषयी माहिती. - ४. राजस्थान व गुजराथ या प्रांतांचे इतिहास. - ५. पृथ्वीराजरासा यांतील गुणदोष. - ६. हा ग्रंथ व या इतिहासावरून पूर्वीची माहिती. - ७. अजमीरचा पीर. - ८. अजमीर. - ९. हा ग्रंथ लिहिण्याचा हेतु.

१. प्राचीनकाळी मुसलमान वगैरे अन्यधर्मी लोक या देशात नव्हते, तेव्हापासून या भारतवर्षात मोठमोठे पराक्रमी क्षत्रिय राजे राज्य करीत होते. परंतु घटीयंत्राप्रमाणे पतनोन्नतीचा जो स्वाभाविक धर्म त्याला अनुसरून पुढे पडत्या काळी त्या सर्व शत्रू क्षात्रवंशांचे शौर्यौदार्य नष्ट होऊन ते सर्वप्रकारे हत झाले व याप्रमाणे क्षात्रधर्मी राजांची, पृथ्वीराज चव्हाण याचे बरोबर एकंदर परिसमाप्ति झाली. पूर्वीपासून आपल्या इकडे इतिहास लिहून ठेवण्याची वहिवाट व हौस नसल्यामुळे आजपर्यंतच्या अनंतकाळचा इतिहास, गेलेल्या काळाबरोबरच विलयाला जाऊन त्या काळाचे ज्ञान काय ते नाममात्राविशेष राहिले आहे! ही स्थिती पाहून इतिहासप्रिय आणि प्राचीनज्ञानलालस जन फार दु:खी होतात; परंतु त्यास आता इलाज नाही. अशी गोष्ट आहे तरी या पृथ्वीराजाजवळ चंद वरदाई म्हणून एक भाट[१] होता. त्याने पृथ्वीराजाचे इतिहासाचा ग्रंथ पद्यात्मक केला असून त्या ग्रंथाचा विस्तार एक लक्ष श्लोकांइतका आहे. या ग्रंथाची प्रख्याति रजपूत लोकांमध्ये फार असून त्याच्या प्रती ठिकठिकाणी आहेत. त्याचप्रमाणे रजपूत राजांचे दरबारात भाट लोक तो इतिहास वाचीत असतात. प्राचीनकाळच्या राम-युधिष्ठिरांच्या संबंधाने जसे 'रामायण', 'भारत', हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत, तसेच अर्वाचीन क्षत्रिय राजांपैकी पृथ्वीराज चव्हाण या राजाचा हा ग्रंथ प्रसिद्ध

१. याविषयींची सविस्तर माहिती पुढे कलम ३ मध्ये दिली आहे ती पहावी.

आहे. या ग्रंथाचे 'भारता' प्रमाणेच पर्वानीं भाग पाडलेले असून ही पर्वे ६९ आहेत.

२. विक्रम संवत् १२४९ म्हणजे इ. स. ११९३ साली हा राजा हस्तिनापुरास कैद होऊन दिल्लीस मुसलमान बादशाही स्थापन झाली. त्याकाळी क्षत्रियवंश कोठे होते व त्यांची काय व्यवस्था होती हे समजण्यास हा 'रासा' ग्रंथच काय तो राहिला आहे. हा 'पृथ्वीराजरासा' अलीकडे बंगालच्या 'एशियाटिक् सोसायटी' नामक प्राचीनग्रंथप्रकाशक मंडळीने कलकत्त्यास छापण्याची सुरुवात केली आहे; परंतु हा ग्रंथ फार मोठा असल्यामुळे हल्ली[१] छापणे चालले आहे याच क्रमाने जर तो छापून प्रसिद्ध होत जाईल तर त्याचे एकंदर प्रकाशन होण्यास निदान दहा वीस वर्षे तरी लागतील असा अजमास आहे. बरे, देशी राजे किंवा एतद्देशीय ऐपतदार लोक यांनी या संबंधाने पुढे होऊन असला प्राचीन ऐतिहासिक ग्रंथ आपल्या खर्चाने प्रसिद्ध करून लोकास मिळेसा करावा; परंतु त्यास ग्रंथप्रसिद्धिचा अथवा पुरातनइतिहासवाचनाचा व शोधनाचा मुळीच छंद नसून त्या हौसेचें बीजच या देशात आजपर्यंत कधी पेरले गेल्याचा दाखला मिळत नाही! तेव्हा आताच आमच्या देशबंधूंस त्याविषयी हौस कोठून उत्पन्न व्हावी? या अशा उदासीनतेमुळे या देशाचा इतिहास व श्रेष्ठपणा अगदी नष्ट होऊन या आर्यावर्तांतल्या विद्यादेवीने गाढ शयन केले आहे! तरी अलीकडे इंग्रज सरकारच्या उत्तेजनाने काही प्राचीन माहिती मिळविण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत; व जसजसे लोकांमध्ये विचाराचे बीज पेरले जाईल, तसतसे तेही शोध करू लागून त्याजमध्ये स्वदेशाचा अभिमान उत्पन्न होईल अशी आशा आहे.

३. ज्या अर्थी या ऐतिहासिक ग्रंथाचा कर्ता भाट आहे त्या अर्थी या भाटांविषयीही येथे थोडीशी माहिती देणे अप्रासंगिक होणार नाही. भाट यांचा धंदा राजवंशांच्या हकीकती व चरित्रे कविताबद्ध करावी, व ती राजांस वाचून व म्हणून दाखवावी. भाटलोक जेथे क्षत्रिय राजे असतात तेथे आहेत. 'भाट' या शब्दाचा वाचक संस्कृतात 'बंदी' हा शब्द आहे, व बंदीजनांनी ही राजचरित्रे गावी असाच त्यांचा धंदा वर्णिला आहे. हल्लीही गुजराथ, काठेवाड व राजपुताना येथे ही भाटजाति फार आहे व त्यास तेथील राजांकडून इनामे, मानमरातब, लग्नकार्यात पोषाख, वगैरे मिळत असतात. क्षत्रियवंशास पडता काळ आला तशी भाटांचीही दुर्दशाच होत गेली. तथापि ज्या ज्या राजांजवळ हल्ली हे भाट आहेत ते ते त्यास ब्राह्मणांपेक्षाही अधिक मानून, त्यांचा

१. सन १८८६ मध्ये जेव्हा हा उपोद्घात प्रथम लिहिला गेला, त्या वेळेचे हे म्हणणे आहे. हल्ली हे छापणे अजीबात बंद आहे असे समजते.

मानमरातब व देणग्या ही रीतीप्रमाणे देण्यास कोणीही हरकत आणीत नाहीत. भाटांस विश्वासू व प्रामाणिक असे समजतात व म्हणून, ज्यास भाट जामीन मिळेल तो दरबारात मान्य झालाच असे समजावे. मुली व स्त्रिया यांजबरोबर पाठराखणीस व सोबतीला देण्यास योग्य अशी मनुष्ये भाट हेच आहेत असे समजतात. भाट म्हणजे बंदीजन आणि बंदीजन म्हणजे स्तुतिपाठक. तेव्हा भाटांनी आपल्या राजवंशाची स्तुति गावी असा संप्रदाय दिसतो व त्याप्रमाणेच आहे. यावरून, भाटांनी आपल्या राजवंशाची जी वर्णने लिहिली आहेत त्यावरून त्या राजांच्या स्तुतिपर इतिहासाखेरीज इतर खरे मजकूर समजणे जरा कठीणच आहे असे दिसते. या भाटजातीत कित्येक फार मोठाले कवि होऊन गेले आहेत व त्या महाकवींपैकीच प्रस्तुत ग्रंथकार हा एक मोठा कवि होता. भाट हे सदैव राजांचे संनिध असून हरएक प्रसंगी सत्कृत्ये, औदार्य व शौर्य यांजकडे त्यांची प्रवृत्ति व्हावी म्हणून त्यांच्या पूर्वजांची सुगुणवादपूरित गीते म्हणून व त्यांची स्तुति करून ते त्यास प्रोत्साहन देतात. राजवंशांची कीर्ती किंवा अपकीर्ति वाढविणारे हे भाटच असत, व त्याकरिता अर्थात् त्यांचा असंतोष होईल असे कृत्य करण्यास कोणी धजत नसत. त्यांचे म्हणणे सर्वांनी मान्य करावे असे वजन ते राजादिकांवर घालीत व ते त्यांनी अमान्य केले तर ते त्रागा[१] व झांसा[२] म्हणजे काही आततायीपणाचे उपाय करीत. याविषयींच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. हल्ली जशी वर्तमानपत्रे, शाळेतली मुले व गुरूपगुरू वगैरे सुशिक्षित मंडळी कीर्ती अथवा दुष्कीर्ति वर्णन करण्यात पुढारी आहे, तशीच भटजाति (ब्राह्मण) व भाटजाति पूर्वकाली सुकीर्ति किंवा दुष्कीर्ति पसरविणारी असे.

पूर्वी मोठमोठ्या युद्धातून व लढायांतून भाट हे राजांबरोबर राहून त्यास, वर सांगितल्याप्रमाणे त्यांच्या पूर्वजांची शौर्योत्पादक कृत्ये वर्णन करून कुलाभिमान धरण्यास धैर्य व आवेश आणीत. भाटांमध्ये अनेक प्रकार आहेत. कंकाळी भाट, मारवाडी भाट, मुसलमान भाट, ब्रह्म भाट, चारण, भारोट, वहीवंचे वगैरे. यांच्या कवितेत संस्कृत

---

१. त्रागा म्हणजे आपले घरचा माणूस मारून त्याचे डोके कापून सरकारचे कचेरीत किंवा शत्रूचे घरी टाकणे, व 'ही हत्या तुजवर पडली' असे सांगणे. या त्राग्याविषयींचे अगदी अलीकडील उदाहरण- इ. स. १८६० साली खंडेराव महाराजांनी जमीनमोजणी केली, तेव्हा कडीच्या भाटांनी असाच त्रागा केला होता, हे पुष्कळास माहीत असेलच.

२. झांसा म्हणजे अमक्याचे घर जाळू किंवा अमक्यास मारू असे कागदावर लिहून तो कागद झाडास बांधून तेणेकरून भय दाखविणे.